आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३ फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत-अमेरिका व्यापार करारावर दोन्ही देशांमध्ये सहमती, सर्व भारतीयांच्या हिताचा करार असल्याचं सरकारचं प्रतिपादन

- भारत-अमेरिका व्यापार करारामुळं शेअर, सराफा आणि परकीय चलन बाजारात दमदार तेजी

- बेशिस्त वर्तनाबद्दल प्रशांत पडोळे यांच्यासह एकूण ८ खासदार लोकसभेतून अधिवेशन कालावधीसाठी निलंबित

- ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरारमध्ये नव्या महापौर आणि उपमहापौरांची निवड

**आणि**

- मार्चअखेरच्या पार्श्वभूमीवर १५ फेब्रुवारीनंतर खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता न देण्याचे राज्य सरकारचे आदेश

**<><><><><>**

भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावरचं आयातशुल्क २५ टक्क्यांवरुन कमी करुन १८ टक्क्यांवर आणण्याचं, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मान्य केल्याची, घोषणा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर केली. ही भारताच्या जनतेची ताकद आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्र्म्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आयात शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्केपर्यंत कमी केलं जाणार आहे. या संदर्भातल्या व्यापार करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असून यापुढं अमेरिकन मालावर भारतात लागणारं शुल्क उतरत्या क्रमानं शून्यावर पोहोचेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार करार हा भारताचं भवितव्य सुनिश्चित करणारा करार असून यामुळे प्रत्येक भारतीयाचं हित साधलं जाईल, असा विश्वास वाणिज्य आणि उद्योजकता मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. या करारामुळे भारताचं जागतिक अर्थव्यवस्थेतलं स्थान पक्कं होईल, असं गोयल म्हणाले. या कराराद्वारे शेतकऱ्यांचं हित जपण्यात आलं असून कृषी, दुग्धविकास, पशुपालन आदी क्षेत्रांना फायदा होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

- **- होल्ड बाईट गोयल - -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी हा व्यापार करार महत्त्वाचा असल्याचं गोयल यांनी नमूद केलं. अभियांत्रिकी क्षेत्र, वस्त्रोद्योग, चर्मोद्योग आणि पादत्राणे, ज्वेलरी, रबर, नैसर्गिक रसायने, मासेमारी या सर्व क्षेत्रांमधे मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. हा करारा भारतासाठी आतापर्यंतचा सर्वात फायदेशीर करार असून यामुळे जागतिक पातळीवरचं भारताचं स्थान अधोरेखित झाल्याचं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र निर्यातीत अग्रेसर असून या करारामुळे राज्यातल्या व्यवसायासाठी नवं क्षितिज खुलं होईल, आणि राज्यात मोठी गुंतवणूक होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे.

भारत-अमेरिका व्यापार करार हा भारतीय उद्योगक्षेत्रासाठी अतिशय सकारात्मक आणि स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

***होल्ड... बाईट- ललित गांधी***

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेमुळे देशातल्या शेअर आणि सराफा बाजारात आज घसघशीत तेजी दिसून आली. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून---

- **- - होल्ड - - -**

व्यवहार सुरू झाले तेव्हाच सेन्सेक्स ४ हजारांहून अधिक आणि निफ्टी बाराशेहून अधिक अंकांनी वधारला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्स ८६ हजारांच्या पातळीजवळ आणि

निफ्टी २६ हजारांच्या वर गेला होता. त्यानंतर बाजार स्थिरावले आणि दिवसअखेर सेन्सेक्स २ हजार ७३ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ७३९ अंकांवर बंद झाला. निफ्टी ६३९ अंकांची तेजी नोंदवून २५ हजार ७२८ अंकांवर बंद झाला. या व्यापार करारामुळं फायदा होणाऱ्या क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात वधारले. या करारामुळं परदेशी संस्थात्मक गुंतवणूक वाढेल या आशेनेही बाजारात तेजी दिसून आली. डॉलरच्या तुलनेत रुपया आज १ रुपया २२ पैशांनी वधारुन ९० रुपये २७ पैशांवर स्थिरावला.

सोन्या-चांदीतही गेल्या ४ दिवसांपासून असलेल्या जोरदार घसरणीला आज विराम दिला. दिवसअखेर मुंबईच्या सराफा बाजारात सोनं पावणे ३ हजार रुपयांनी वधारलं. एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५६ हजार आणि एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५२ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम ग्राहकांना आज मोजावी लागत होती. १ किलो चांदी आज सुमारे साडे ४ हजार रुपयांनी महाग झाली आणि चांदीचे दर २ लाख ७२ हजार रुपयांच्या जवळ पोहोचले.

**<><><><><>**

लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षांच्या आठ खासदारांना अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठी सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. यात भंडारा गोंदियाचे प्रशांत पडोळे यांच्या सह काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका खासदाराचा समावेश आहे.

लोकसभेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा चीनचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. युरोपियन युनियन आणि अमेरिका यांच्यासोबतच्या व्यापार कराराचा मसुदा सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी मागणीही विरोधकांनी लावून धरली. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज तीन वेळा तहकूब केलं. दरम्यान सभापतींच्या आसनाकडे कागद भिरकावणाऱ्या सदस्यांच्या विरोधात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मांडलेला या खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर झाला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरारमध्ये महापौर आणि उपमहापौरांची आज निवड झाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- - -होल्ड - लाइव्ह व्हाइस कास्ट कौस्तुभ - -**

ठाण्याच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची, आणि उपमहापौरपदी भाजपाचे कृष्णा पाटील यांची निवड झाल्याची घोषणा ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी आज केली. तर, कल्याण डोंबिवलीच्या महापौर म्हणून शिवसेनेच्या हर्षाली थविल, आणि उपमहापौरपदी भाजपाचे राहुल दामले यांची बिनविरोध निवड आज जाहीर करण्यात आली. उल्हासनगर महापालिकेत महापौरपदी शिवसेनेच्या अश्विनी निकम आणि उपमहापौरपदी भाजापचे अमर लुंड यांची निवड आज झाली.

वसई-विरार महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी आज झालेल्या विशेष सभेत बहुजन विकास आघाडीचे अजीव यशवंत पाटील यांची महापौर म्हणून, तर मार्शल डॉमनिक लोपीस यांची उपमहापौर पदी बहुमतानं निवड झाली.

पुण्याच्या महापौर पदासाठी भाजपानं मंजुषा नागपुरे यांना, तर काँग्रेसनं अश्विनी लांडगे यांना उमेदवारी दिली आहे. उपमहापौर पदासाठी भाजपानं रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे परशुराम वाडेकर यांना उमेदवारी दिली असून, काँग्रेसतर्फे साहिल केदारी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नागपूर महापालिकेत भाजपानं महापौर पदासाठी नीता ठाकरे यांना, तर उपमहापौर पदासाठी लीला हातीबेद यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसनं महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे, तर उपमहापौरपदासाठी विवेक निकोसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपानं हिमगौरी आडके यांना आणि उपमहापौरपदासाठी मच्छिंद्र सानप यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेनेकडून महापौरपदासाठी रंजना बोराडे यांनी, तर उपमहापौर पदासाठी विलास शिंदे, राहुल दिवे आणि प्रविण तिदमे यांनी अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><>**

१५ फेब्रुवारीनंतर कोणत्याही प्रकारच्या खरेदीच्या प्रस्तांवाना प्रशासकीय मान्यता देऊ नये किंवा खरेदीच्या निविदा प्रसिद्ध करु नये असे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. चालू वर्षात दैनंदिन कार्यालयीन वापराच्या वस्तूंच्या मर्यादित खरेदीसाठी हे निर्बंध नसतील.

पण पुढील वर्षात लागणाऱ्या वस्तूंची आगाऊ खरेदी करता येणार नाही, असंही वित्त विभागानं आज प्रसिद्ध केलेल्या शासन आदेशात नमूद आहे. फर्निचर तसंच संगणक आणि त्याच्या सुट्या भागांची दुरुस्ती, विविध कार्यशाळा वगैरेंच्या खर्चाला १५ फेब्रुवारीनंतर मंजुरी देऊ नये, असंही यात स्पष्ट केलंय.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या पालघर इथं मुंबई-अहमदाबाद हाय स्पीट रेल्वे प्रकल्पासाठीच्या दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण झाल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. आतापर्यंत ३३४ किलोमीटरचा लोहमार्ग आणि ४१७ किलोमीटर घाट आणि पुलाचं बांधकाम पूर्ण झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**